# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u>** :- नागपूर शहराचे विविध दहनघाटावर स्थापित डिझल/एलपीजी
**{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** शवदाहिनीचे देखभाल व किरकोळ दुरुस्ती तसेच शवदाहिनी चालविण्याच्या कामाकरीता मनुष्यबळ नियुक्ती व प्रति शवप्रमाणे प्रचलित बाजार दरानुसार २२ लिटर डिझल व १९ किलो एलपीजी सिलेंडर चा निशुल्क पुरवठा करण्याच्या कामाकरीता प्रति वर्ष रु. ४०,०९,२२८/- प्रमाणे दोन वर्षाकरीता रु. ८०,१८,४५६/- खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता प्रदान करुन नविन निविदा मागविण्याच्या व नविन निविदा पुर्ण होईस्तोवर जुन्या मंजुर दरावर काम सुरु ठेवुन सदर खर्च पद क्र. A२३५०११३०८०६ मधुन भागविण्या करीता मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव सविनय सादर.

**टिप** :- सविस्तर माहिती नस्ती मध्ये उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 1231/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :-24/01/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग , यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहराचे विविध दहनघाटावर स्थापित डिझल/एलपीजी शवदाहिनीचे देखभाल व किरकोळ दुरुस्ती तसेच शवदाहिनी चालविण्याच्या कामाकरीता मनुष्यबळ नियुक्ती व प्रति शवप्रमाणे प्रचलित बाजार दरानुसार २२ लिटर डिझल व १९ किलो एलपीजी सिलेंडर चा निशुल्क पुरवठा करण्याच्या कामाकरीता प्रति वर्ष रु. ४०,०९,२२८/- प्रमाणे दोन वर्षाकरीता रु. ८०,१८,४५६/- खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता प्रदान करुन नविन निविदा मागविण्याच्या व नविन निविदा पुर्ण होईस्तोवर जुन्या मंजुर दरावर काम सुरु ठेवुन सदर खर्च पद क्र. A२३५०११३०८०६ मधुन भागविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.